आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

## महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र


## School Leadership Academy

## Maharashtra

## मोड्यूल क्र.१६

# महाराष्ट्रातील प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील शाळांमधील डिजिटल डिव्हाइड वर मात करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यामध्ये शैक्षणिक नेतृत्वाची भूमिका

# The Role of School Leadership (HM) to Overcome the Digital Divide for Imparting Quality Education to Students



## ● प्रस्तावना - डिजिटल डिव्हाइड (Digital divide )

भारतात जगातील सर्वात मोठी शिक्षण प्रणाली आहे. सुमारे दीडशे दशलक्षाहून अधिक विद्यार्थी सुमारे एक दशलक्ष शाळांमध्ये प्रवेश घेऊन शिक्षण घेत आहेत. देशातील कोविड 19 लॉक-डाऊनमुळे शाळा बंद कराव्या लागल्या आणि ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय स्वीकारावा लागला. विद्यार्थ्यांचे शिकणे आणि मूल्यांकन ऑनलाइन मोडवर गेले. चॅट-टॉक मोड्वरून ऑनलाइन-मोड कडे जाणाऱ्या बदलामुळे भारताच्या शैक्षणिक प्रणालीला खूप अडचणींचा सामना करावा लागत आहे. भारताची खूप मोठी जनसंख्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याने ऑनलाईन साधन सामग्री पासून वंचित असलेली आपणास दिसून येते.कोरोना काळामध्ये ही बाब प्रकर्षाने आपणास शिक्षण क्षेत्रात निदर्शनात आली .हा काळ भारतातील शैक्षणिक क्षेत्रासाठी आव्हानात्मक ठरला आहे. भारतातील फक्त एक तृतीयांश मुले ऑनलाइन शिक्षण घेत आहेत. सप्टेंबर 2020 मधील राष्ट्रीय शैक्षणिक स्थिती च्या वार्षिक अहवालात शालेय शिक्षणात विषमता किती व्यापक आहे हे अधोरेखित केले आहे. शहरी तसेच ग्रामीण भागातील सर्वच स्तरावर (1-12 ) वर्गांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे अनेक वर्षापासून एक ज्ञात आव्हान आहे . आता ऑनलाइन पद्धतीने शिक्षणासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे वीज, स्मार्टफोन, संगणक व इंटरनेट यांची कमतरता असल्यामुळे हे आव्हान आणखीनच तीव्र झाले आहे. आमच्या शाळा , स्यामुळे वंचित मुलांचा वर्ग अध्ययनामध्ये कमी पडतो . समाजातील अनेक आर्थिक दुर्बल कुटुंब आजही मुख्यत्वे सरकारवर अवलंबून आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी शालेय प्रणाली मध्ये डिजिटल शिक्षणामध्ये फारच कमी सुविधा असतात किंवा बहुतांश उपलब्ध नसतात.

ही परिस्थिती डिजिटल डिव्हाइड म्हणजे शैक्षणिक तंत्रज्ञान साधने व त्यांच्यासाठी आवश्यक असलेली पूरक साधने यांचा अभाव सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती तयार करते,जे डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञानात प्रभावी सुविधा असणारे लोक आणि अगदी मर्यादित किंवा अजिबात सुविधा नसलेल्या लोकांमधील अंतर दर्शविते .

## ● मोड्यूल लेखनाची उद्दिष्टे -

1. डिजिटल डिव्हाइड ही संकल्पना समजून घेणे.
2. डिजिटल डिव्हाइड मधील शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
3. डिजिटल डिव्हाइड ची आव्हाने पेलण्यासाठी शालेय नेतृत्वाचे कार्य समजून घेणे .
4. डिजिटल डिव्हाइड वर मात करण्यासाठी योग्य दृष्टीकोन विकसित करण्यास मदत करणे.

## ● डिजिटल डिव्हाइड या शब्दाचा अर्थ व व्याख्या :-

हनिमन आणि रुएडिन (2007) यांनी याचे वर्णन करतांना डिजिटल डिव्हाइड ' हा शब्द वापरला.

डिजिटल डिव्हाइड' या शब्दाचा अर्थ हीच त्याची व्याख्या आहे त्या खालीलप्रमाणे

1. “ डिजिटल डिव्हाइड' म्हणजेच तंत्रज्ञानातील आवश्यक साधनांचा अभाव.”

2. "डिजिटल डिव्हाइड' म्हणजेच व्यक्ती, घरे आणि व्यवसाय यांच्यामधील अंतर आहे आणि भौगोलिक क्षेत्रे,त्यांच्या संबंधित भिन्न सामाजिक-आर्थिक स्तरांवर माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) आणि त्यांच्या वापरामध्ये प्रवेश करण्याची संधीचा अभाव आणि इंटरनेटचा उपयोग यापासून वंचित असणे

3. डिजिटल डिव्हाइड' म्हणजे “माहिती तंत्रज्ञानाचा असमान प्रवेश आणि वापराचा अभाव ” असेही संबोधले जाते .


- **डिजिटल डिव्हाइड चे प्रकार -**


1) भौगोलिक डिजिटल डिव्हाइड (प्रदेश आणि देशांदरम्यान), 2) सामाजिक डिजिटल डिव्हाइड
3) अपग्रेड केलेले डिजिटल डिव्हाइड ( तंत्रज्ञान आणि मानव यांच्यात )
4)टेलीडेन्सिटी डिव्हाइड ,इंटरनेट डिव्हाइड 5).मोबाइल डिव्हाइड.

- **इ-लर्निंग व ऑनलाइन शिक्षणाची सद्यस्थिती - भारत व महाराष्ट्र :-**




“ डिजिटल डिव्हाइड अपेक्षेपेक्षा खूप जास्त आणि ऑनलाइन शिक्षण अजूनही वास्तविकतेपासून दूर आहे ”
. ,ASER रिपोर्ट 2020.
खालील आलेखावरून आपणास भारतात ऑनलाईन सुविधेची उपलब्धता स्थिती









यावरून “विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता डिजिटल पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेत अधिक गुंतवणूक करण्याची शैक्षणिक क्षेत्राला गरज आहे”.डिजिटल सामग्री तयार केली गेली आणि प्रसारित केली गेली असली तरी,विद्यार्थी त्यात गुंतलेले आहेत की नाही आणि त्याचा त्यांच्या सहभागावर आणि शिकण्यावर परिणाम होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी कोणतीही यंत्रणा आपल्याकडे उपलब्ध नाही


SCERT महाराष्ट्र व UNICEF यांच्या संयुक्त विद्यमाने सप्टेंबर 2020 प्रकाशित केलेला खालील अहवाल महाराष्ट्रातील डिजिटल डिव्हाइड ची सद्यस्थिती दर्शविते . ती खालीलप्रमाणे

Rapid survey of student access to the Home Learning Package in Maharashtra






- 


- **महाराष्ट्रात डिजिटल डिव्हाइड असण्याची कारणे**




- **शाळा डिजिटल करण्यासाठी महाराष्ट्रात झालेले प्रयत्न**

महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात शाळा डिजिटल करण्यासाठी एकूण नऊ शासकीय परिपत्रके (जी.आर.)शालेय शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक सत्र 2015-16 पासून काढण्यात आले,त्यातून तंत्रज्ञानाच्या वापरातून शिक्षण देण्यात महाराष्ट्रात खूप मोठे काम झाले.

- **महाराष्ट्रातील शाळा डिजिटल करण्यासाठी शासनाने केलेले शासकीय ठराव आणि परिपत्रकांचे विश्लेषण**

| No | Type of Document | Identification (Romanised) | Date Issued | Title (English translation) | Issuing Authority |
|---|---|---|---|---|---|
| 1 | GR | Government Resolution No.: *śaiguvi* 2015/(80/15)S.D.6 | 22 June 2015 | Implementation of Educationally Progressive Maharashtra (*Pragata Śaikshanika Maharashtra*) programme from 2015-16 | School Education and Sports Department |
| 2 | GR | Government Resolution No.: *śaiguvi* 2016/(5/2016)/SD-6 | 23 March 2016 | Social Acceptance for Money and Other Resource Donations by Society | School Education and Sports Department |
| 3 | GR | Government Resolution No.: *śaiguva*-2016/*prakra*. (181/16)/ SD-6 | 06 December 2016 | Use of e-content available on website | School Education and Sports Department |
| 4 | GR | Government Resolution No.: *sankirna* 2016/ *pra.kra*.202/ SD.-6 | 09 January 2017 | Rapid Educationally Progressive Maharashtra (*Jalada Pragata Śaikshanika Maharashtra*) | School Education and Sports Department |
| 5 | GR | Government Resolution No.: CSR-4316/(79/2016)/ *praśikshata* | 19 April 2017 | Regarding digitalisation of schools in the state with the co-operation of Rotary South Asian Society (RSAS) | School Education and Sports Department |
| 6 | GR | Government Resolution No.: *sankirna*-2020/ *pra.kra*.86/SD-6 | 15 June 2020 | Guidelines for phased start of schools/education in the state after relaxation of Corona lockdown | School Education and Sports Department |
| 7 | Circular | *marāśaiśāvaprapa/ tantrasneht kāryaśāla/* 2015-16 | 01 January 2016 | Regarding attendance of expert tech-savvy guides at the state level workshop for tech-savvy teachers | Maharashtra State Council of Educational Research and Training |
| 8 | Circular | *viprā*/IT/1105/2017-18 | 25 March 2017 | Releasing the relevant individuals from work for the workshop on creation of e-material for MITRA app | Maharashtra State Council of Educational Research and Training |
| 9 | Circular | *viprā/ingraji*/3140/ 2016-17 | 04 September 2017 | Regarding the noteworthy work of schools | Maharashtra State Council of Educational Research and Training |

- **शिक्षणाचे डिजिटलीकरण करण्यातील शासन स्तरावर झालेले काम –**
    - टीव्ही Channels- स्वयंम प्रभा/ बालचित्रवाणी /रेडिओ आणि समुदाय रेडिओ
    - DIKSHA -एक राष्ट्र एक डिजिटल प्लॅटफॉर्म/MSCERT websites
    - प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र चळवळ
    - शिक्षकांना तंत्रस्नेही होण्यासाठी राज्यव्यापी प्रशिक्षण कार्यक्रम
    - शाळांमध्ये डिजिटल उपकरणांची उपलब्धता व वापर

महाराष्ट्रात शाळा डिजिटल करणे त्यातून अध्ययन प्रक्रिया सुरु ठेवणे यात काही शाळांनी पुढाकार घेतला मात्र, कोविड -१९ परिस्थितीत ग्रामीण भागातील शाळा मोठ्या प्रमाणात प्रभावित झाल्या. डिजिटल डिव्हाईडमुळे ग्रामीण भागात अनेक ठिकाणी मुलांचे शालेय शिक्षण जवळपास थांबले, मात्र अशा विपरीत परिस्थितीतही डिजिटल डिव्हाईड वर मात करण्यात काही शाळा यशस्वी झाल्या त्यातील एका शाळेची यशोगाथा पुढीलप्रमाणे -

**आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा ,बोराखेडी, ता - मोताळा जि- बुलडाणा 443001**

**युडायस क्रं 27040506901**

**उच्च श्रेणी मुख्याध्यापक :- अनिल कनिराम चव्हाण (एम ए एम एड डि.एस. एम.)**

**मो. नं 9767866933, 7796228888 इ- मेल :- . anilkaniramchavhan@gmail.com**



**शाळेची आजची सुसज्ज इमारत व परिसर**

शाळा आदिवासी वस्ती मध्ये आहे. शाळेत वंचित शेतकरी कुटुंबातील हलाखीचे जीवन जगणाऱ्या पालकांची मुले या शाळेत शिक्षण घेतात . एकेकाळी ओसाड जागेवर असलेल्या शाळेत विद्यार्थी येत नव्हते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी व गुणवत्ता विकास करण्यासाठी शाळेचा विकास कसा होइल यासाठी जिल्हा परिषद बोराखेडी शाळेत मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी अमुलाग्र आपल्या दैनंदिन कार्यप्रणालीत बदल केला . विद्यार्थी पटसंख्येंत वाढ कशी होईल व शालेय परिसर शैक्षणिक दृष्ट्या योग्य कसा करावा यासाठी विशेष नियोजन केले. पालक सभा घेतल्या,महीला शिक्षकांनी माता पालक सभा घेतली व घरोघरी जाऊन पालक विद्यार्थी संपर्क साधला. सांस्कृतिक कार्यक्रम थोर पुरुषांची जयंती असे अनेक उपक्रम राबविले .लोकवर्गणीतून शैक्षणिक भौतिक सुविधा उपलब्ध करून घेतल्या. शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले, व परिसर शैक्षणिक दृष्ट्या आकर्षक बनविला . शाळेच्या भिंती शैक्षणिक दृष्ट्या बोलक्या करून शाळेची रंगरंगोटी केली . त्यासाठी इतर शाळा, तज्ञ व इंटरनेट चा उपयोग करून विविध साहित्य मुख्याध्यापक व शिक्षकांनी उपलब्ध केले . विद्यार्थी शाळेत आले पाहिजे यासाठी त्यांना आनंददायी शिक्षण व खेळांसाठी प्रवृत्त केले. विद्यार्थ्यांना समान संधी देत त्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले त्यासाठी बाल आनंद मेळावा, बालसभा , विद्यार्थी मंत्रीमंडळ असे उपक्रम सुरू केले. शाळा समिती , सरपंच, पालक यांना जयंती निमित्त शालेय परिवारातील सदस्य बनवून शाळेशी सलोख्याचे संबंध निर्माण करून शाळेचा विकास साधला आहे.

विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात कृतीयुक्त अध्ययन- अध्यापण कौशल्यावर भर देत असुन पारंपरिक खेळ, कला ,संगीत,संस्कृत, अतुल्य भारत , पर्यावरण, विज्ञान, प्रत्यक्ष अनुभव, सर्जनशीलता यावर भर देऊन दिर्घ काळ टिकेल असे ज्ञान निर्माण करण्यावर भर दिला जातो. आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम हा मातृभाषेतून देऊन यावर जास्त भर दिला जेणे करून विद्यार्थ्यांना मातृभाषेतून आपली संस्कृती ,इतिहास,व कौटुंबिक माहिती सहज समजण्यास मदत होइल यासाठी विशेष प्रयत्न केले.

जि.प.,बोराखेडी शाळेत 2012 ला कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक वातावरण नव्हते तसेच कोणत्याही शैक्षणिक भौतिक सुविधा नव्हत्या अशा परिस्थितीत मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी पालक संपर्क करून शाळा समिती यांची मदत घेतली. शाळा परिसर तसेच शहरातील दानशूर लोकांची मदत घेऊन लोकवर्गणीतून शैक्षणिक भौतिक सुविधा उपलब्ध करून घेतल्या . सुरवातीला कोणत्याही डिजीटल सुविधा नसलेल्या शाळेत आज 3 प्रोजेक्टर, 55 इंची LED TV , समूह सहभागातून इंटरनेट व वॉयफाय सुविधा निर्माण केल्या आहेत. खडू फळा ऐवजी तेथे व्हॉइट बोर्डाचा वापर शिक्षक करत आहेत व डस्टर विरहीत वर्ग तयार केले आहे. ग्रामीण भागातील शाळा असुनही निसर्गरम्य सौंदर्य सृष्टीने नटलेली मनमोहक वातावरण निर्मिती करून एखाद्या खाजगी शाळेपेक्षाही आकर्षक अशी शाळा निर्माण केली आहे. आजुबाजुच्या खेड्यातील 150 विद्यार्थी शाळेत प्रवेशित आहे. 2012 या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्या 251 होती. आज 2021 मधे पटसंख्या 474 आहे.

मात्र कोविड -19 च्या प्रभावामुळे शाळा बंद झाल्या. बोराखेडी गावात वीज व्यवस्था अनियमित, पालकांकडे स्मार्टफोन उपलब्ध नाही. इंटरनेटची सुविधा नाही. त्यामुळे मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा समिती यांच्या सहकार्याने डिजिटल डिव्हाईड कमी करण्यासाठी खालील प्रयत्न केले.

**१. मंदिरातील शाळा –** कोविड -19 च्या प्रादुर्भावामुळे राज्यात शाळा बंद आहेत. ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा वापर अनेक ठिकाणी सुरु आहे. मात्र बोराखेडी मध्ये वीज व्यवस्था, स्मार्टफोन, इंटरनेट सुविधा फार कमी उपलब्ध आहेत. विद्या र्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून, बोराखेडी च्या मुख्याध्यापक व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या घरी संपर्क केला. ग्रामस्थांच्या परवानगीने गावातील मंदिर आणि समाज मंदिर येथे विद्यार्थ्यांचे वर्ग निहाय लहान गट केले, काही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष घरी जाऊन अवघड संकल्पना शिकवण्याचा उपक्रम सुरु केला. यासाठी पालकांना विश्वासात घेतले. घरपोच अभ्यास वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला. मुख्याध्यापक व शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन अभ्यास तपासतात व दुरुस्ती शिकवतात.


महाराष्ट्र टाइम्स नागपूर । गुरुवार, २७ ऑगस्ट २०२०

मंदिरातील 'शाळा' लावी अभ्यासाचा लळा!

समाजमंदिरात विद्यार्थ्यांना शिकविताना बोराखेडीच्या शिक्षिका.

गोंदियात गृहभेटीतून शिक्षणकार्य

म. टा. वृत्तसेवा, बुलडाणा

बोराखेडीतील शिक्षकांचा घरपोच ज्ञानदीप




**२. रचनावादी अध्ययन व मूल्यमापनाचा वापर –** विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी वर्गवार चाचणी रुपात अभ्यास तयार करण्यात आला, ज्यात अक्षर, अंक ओळखा, शब्दांच्या जोड्या जुळवा , गाळलेले अंक भरा, बेरीज, वजा बाकी करा, चित्र ओळखून नाव लिहा. चित्र रंगवा, मागची-पुढची संख्या लिहा. शब्दांपासून वाक्य तयार करा, उतारा वाचून प्रश्नाची उत्तरे लिहा. या चाचण्यांना पालकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम आठवड्यातून एकदा विषय निहाय, वर्ग निहाय कार्यान्वित केल्याने विद्यार्थ्यांनी उत्साहाने चाचण्या सोडविल्या या चाचण्यांच्या मूल्यमापनातून शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या मार्फत विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे अनुधावन करण्यात आले.


सायंदैनिक

गुड इव्हिनिंग City

धेय्याचा ध्यास लागला कि कामाचा त्रास होत नाही

goodeveningcity@gmail.com

८ जुलै २०२०, बुधवार | वर्ष ९ वे | अंक ८३ वा | पृष्ठ ४

# शाळा बंद पण शिक्षण सुरु

## बोराखेडी जि.प. शाळेकडून घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना नोट्स

बुलढाणा, ८ जुलै (गुड इव्हिनिंग सिटी): कोरोना महामारी मुळे सध्या शाळा बंद असून विद्यार्थी घरी आहे. श्रीमंतांच्या शाळांनी ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु केला आहे. लॅपटॉप किंवा मोबाईलवरुन विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले जात आहे. पण दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्यांकडे ॲंड्राईड मोबाईल येणार कुठून ! मग असे गरीब विद्यार्थी प्रवाहाच्या बाहेर पडण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था आणखीनच वाईट आहे. पण बोराखेडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या व्यवस्थापनाने यावर चांगली क्लुप्ती काढली आहे.

आंतरराष्ट्रीय जि प शाळा बोराखेडी मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी शाळास्तरावर वर्गवार चाचणी रुपात अभ्यास तयार करुन त्याच्या झेरॉक्स काढून प्रत्येक विद्यार्थ्याला घरी जाऊन वाटप करण्यात आले. हा उपक्रम दर आठवड्यासाठी राहणार असून दर आठवड्याला विद्यार्थ्यांना अभ्यास वाटप होणार. अक्षर अंक ओळखा, शब्दांच्या जोड्या लावा, गाळलेले अंक भरा, बेरीज, वजाबाकी, चित्र ओळखून नाव लिहा, चित्र रंगवणे, उतारा वाचून प्रश्नाची उत्तरे लिहा, मागची पुढची संख्या लिहा शब्द तयार करा असे वर्गानुसार अभ्यास विद्यार्थ्यांना झेरॉक्स काढून घरपोच दिल्याने पालकांना खूप दिलासा मिळाला. अनेक पालकांनी शाळेत येऊन अभ्यास मुलांचा नेला व या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना घरपोच अभ्यास देण्यासाठी सौ.अनुप्रिता [illegible], सौ.सुनिता हुडेकर, सौ.[illegible] गजभिये, सौ.सिमा गोरे यांनी पुढाकार घेतला हे विशेष.

**३. पुस्तक वाचा, बक्षीस मिळवा उपक्रम –** कोरोना काळ सुरु आहे. विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन शिक्षणाची सुविधा उपलब्ध नाही. यातून विद्यार्थी वाचनापासून दूर जाऊ शकतात व त्यांची वाचन क्षमता कमी होऊ शकते. यावर मात करण्यासाठी शाळेने एक उपक्रम सुरु केला ज्यात पुस्तके उपलब्ध करून दिली. विद्यार्थी, पालकांसमोर एक छोटे पुस्तक वाचून दाखवतात. या नंतर पालक शिक्षकांना फोन करतात. त्यानंतर मुख्याध्यापक स्वतः घरी जाऊन अशा विद्यार्थ्यांना एक वही व पेन बक्षीस देतात. यातही पालकांचा सहभाग उत्तम मिळाला. बक्षिसामुळे विद्यार्थी वाचन करू लागले. यातून वाचन संस्कृती वाढण्यास मदत झाली.

## 'पुस्तक वाचा बक्षीस मिळवा' शाळा बंद काळातील नाविण्यपूर्ण उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मोताळा (प्रतिनिधी) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमा अंतर्गत प्रत्येक मुल शिकले पाहिजे हे शिक्षणाचे खास उद्दीष्ट आहे. परंतु सध्या शाळा पुर्ण पणे बंद आहे. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय जि.प. शाळा बोराखेडी येथील शिक्षक संकटांवर मात करत विद्यार्थी गुणवत्तेसाठी नवनविन उपाय शोधत आहे. आंतरराष्ट्रीय जि प शाळा बोराखेडी येथील मुख्याध्यापक अनिल चव्हाण सतत गरीब वंचित विद्यार्थ्यांना नवनीन उपक्रमांच्या माध्यमातून ज्ञान रूजविण्याचा प्रयत्न करत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सातत्याने धडपड करत आहे.

२६ जून पासुन गावात विद्यार्थ्यांना स्वाध्याय पेपरच्या माध्यमातून शिक्षण असो की समाजमंदिरात शाळा असो परिस्थिती चा आढावा घेत मास्क सॅनिटायझर सोशल डिस्टंगशिंग चे सर्व नियमांचे पालन करत विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य अविरत सुरू आहे. गावात शिक्षक येतात हे बघुन विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढत आहे, मार्च महीन्यापासु विद्यार्थी शाळेपासून दूर आहे त्यांना आता शिक्षक व शाळा याची ओढ निर्माण झाली आहे. शाळा सुरू होण्यासाठी सध्या तरी प्रतिक्षा करावी लागेल परंतु विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत राहु नये या सकारात्मक विचाराने बोराखेडी येथील मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी घरच्या घरी एक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे पुस्तक वाचा बक्षीस मिळवा या उपक्रमात विद्यार्थी आपल्या घरीच पालकांना जवळ घेऊन एक पुर्ण पुस्तक वाचन करतील पालक मुख्याध्यापक किंवा शिक्षक यांना फोन करून सांगतील मुलाने पुर्ण पुस्तक वाचन केले.यानंतर कोणत्या विषयाचे पुस्तक, किती वेळात, वाचन केले याची शहानिशा झाल्यानंतर तो विद्यार्थी बक्षीसास पात्र ठरविण्यात येतो व त्या मुलाला घरपोच वही पेन हे बक्षीस दिल्या जाते. पुस्तक वाचन करत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे पालकांचे रोजचे मुख्याध्यापक शिक्षक यांना फोन सुरु झाले आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन आकलनशक्ति वाढून स्वयंअध्ययनाची सवय लागत असून बक्षिस मिळण्याची उत्सुकतेपोटी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. गंम्मत अशी आहे की या उपक्रमामुळे विद्यार्थी स्वत: आपला अभ्यासक्रम एका महिन्यात पुर्ण करतात. पुस्तक वाचा बक्षीस मिळवा या उपक्रमाचे उद्दिष्ट एवढेच की ग्रामिण भागातील विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात गुंतून असावा कोरोनाच्या काळात शाळा बंद असली तरी शिक्षण सुरू असावे. या उपक्रमात शिक्षक सौ अनुप्रिता व्याळेकर, सौ सुनिता हुडेकर, सौ वार्मिद्रा गजभिये, सौ सिमा गोरे, नलिनी जाधव महेंद्र तायडे हे घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहेत, यामुळे विद्यार्थ्यांना पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**४. 'विद्यार्थी दिवस आयोजन' –** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळेचा पहिला दिवस – ७ सप्टेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून मुख्याध्यापकांनी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून विद्यार्थी दिवस साजरा केला व प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज किमान एक पान तरी लेखन करावे. यासाठी वही पेन रुपात शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना दिले. विद्यार्थ्यांची लेखन क्षमता वाढणे हा त्यामागचा उद्देश होता. विद्यार्थ्यांच्या लेखनाचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी अनुधावन केले.

**५.कोरोना काळात पट संख्या वाढ –** शाळेत विद्यार्थी गुणवत्तेसाठी व शिक्षण सहभागासाठी सतत उपक्रम सुरु आहेत. या उपक्रमांमुळे शाळेमध्ये विद्यार्थी प्रवेश संख्या वाढली. २५१ पट संख्येवरून कोरोना काळ असतांनाही शाळेचा पट ४७५ एवढा झाला. आजू बाजूला खाजगी व्यवस्थापनाच्या आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा असूनही या शाळेचा पट मोठ्या प्रमाणात वाढला. यातून शाळेने घेतलेले परिश्रम दिसून येतात.

अशा  प्रकारे डिजिटल डिव्हाईड मुळे निर्माण झालेल्या विद्यार्थ्यांच्या शालेय प्रगती बाबतच्या समस्या सोडविण्यासाठी बोराखेडी  शाळेने अनेक उत्तम उपक्रम राबविले. ज्यातून विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया सुरळीत सुरु आहे.



# ऑनलाईन शिक्षणापेक्षा ऑफलाई शिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. साक्षिवंदना

**मोताळा । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय बोराखेडी शाळेचा स्तुत्य उपक्रम.... कोविड १९ या काळातील ऑनलाईन शिक्षण हे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना देण्यासाठी शिक्षकांना एक खुप मोठी डोकेदुखी व आव्हान आहे.कारण ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांजवळ अँन्ड्रॉईड मोबाईल फोन खुप अल्पप्रमाणात आहे.त्यात सध्या मोताळा तालुक्यात नेटवर्कचा खुप मोठा प्रॉबलेम आहे.आणि आता शेतकरी कुटुंबांचा शेतीचा कापूस, सोयाबीन चा हंगाम सुरू आहे पालक घरी नसताना मुलांना मोबाइल मिळत नाही. तसेच जो ऑफलाई अभ्यास शिक्षक तयार करतात तो घेण्यासाठी शाळेत घ्यायला येत नाही. बोराखेडी येथील मुख्याध्यापक अनिल चव्हाण व शिक्षक विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना प्रत्यक्ष स्वाध्याय देत असुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आनण्यासाठी मार्गदर्शन करत आहे. फक्त मोबाईल द्वारे ऑनलाईन शिक्षणावर अवलंबून न राहता दर आठवड्याला ऑफलाई अभ्यास तयार करून घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना देऊन मागील अभ्यासाबाबत आढावा घेत आहेत. कारण ऑनलाईन पेक्षा ऑफलाई अभ्यास करण्यासाठी विद्यार्थी व पालकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.कारण ऑनलाईन सारखा कोणताही खर्च या ऑफलाई अभ्यास करण्यासाठी होत नाही. शिक्षक स्वत: ऑफलाई अभ्यासाच्या झेरॉक्स काढून विद्यार्थ्यांना देतात.अशा पद्धतीने बोराखेडी येथील शिक्षक संकटांवर मात करत विद्यार्थी गुणवत्तेसाठी नवनविन उपक्रम राबवित आहे.आज सौ अनुप्रिता व्याळेकर सौ सुनिता हुडेकर सौ सिमा गोरे सुनिता न्हावकर महेंद्र तायडे यांनी सहकार्य केले.

**६.सेल्फी विथ स्टडी,या उपक्रमाने विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले .ज्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु राहिले.**




**७. आँफलाइन /आँनलाइन वाचन स्पर्धा व घरोघरी स्वाध्याय वाटप .**



८. इंटरनेट सुविधा शालेय परिसरात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली
९. अनेक दानशूरांकडून वापरलेले ( Android ) फोन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले.
१०. शिक्षण मित्र नेमून गावातील युवकांना शाळेशी जोडले व त्यांचा उपयोग शाळेने शिक्षण सुरु ठेवण्यासाठी केला आहे.





लोकमत

'शिक्षण आले दारी' उपक्रमातून ज्ञानार्जन

११. लॉंकडाऊन काळात शाळा बंद पण शिक्षण सुरू या उपक्रमात विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी मोबाइल द्वारे अँपच्या माध्यमातून युट्युबच्या , गुगल मिट झुम मिटींग च्या माध्यमातून नियमत ऑनलाइन शिक्षण स्वाध्याय देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. तसेच ऑनलाइन लेखन कविता वाचन भाषण चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.


आजतक

Mob-9922413806

शनिवार दिनांक १९ डिसेंबर २०२०


आंतरराष्ट्रीय जि प बोराखेडी शाळेची पटसंख्येसह शिक्षक संख्या वाढली

**चिंतनात्मक प्रश्न.**

1. डिजिटल डिव्हाईड ची समस्या सोडविण्यासाठी शाळेने केलेले प्रयत्न मुद्यांच्या स्वरुपात लिहा.

2. यापेक्षा आणखी वेगळे कोणते प्रयत्न करता येतील.

- **डिजिटल डिव्हाईड रोखण्यासाठी असेही करता येईल.**



The real danger is that of widening the divide between those who own digital means of transaction, and those who are structurally unable to access them

**.स्वस्त / सवलतीच्या डेटा पॅक**

**•"डिजिटल समावेशन**

**•सायबर सुरक्षा आणि गोपनीयता उपाय**

***•मुलांचे वय आणि वर्ग,भाषा ,अध्ययन शैली ,आवड यानुसार व अनुरूप कृतीची निर्मिती.***



**शिक्षकांचे प्रशिक्षण**

**•अध्ययनातील शिक्षण साधनांच्या पलीकडे तंत्रज्ञानाचे निराकरण**

**•"संतुलित ऑनलाइन / ऑफलाइन कृती**

**•शारीरिक, मानसिक आरोग्य आणि विद्यार्थी केन्द्री कृती आयोजन.**



सानुकूलित उपाय

•तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक

•दृक्श्राव्य स्वरूपातील विशेष इ-कॉन्टेन्ट

•सुरक्षा आणि नीतिशास्त्र संबंधित खबरदारी

डिजिटल डिव्हाईडच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्यांचा वापर संघ बांधणीतून आणि प्रभावी नेतृत्व व्यवस्थापनातून केला तर, निश्चितच अडचणी दूर करता येतात.

**अधिक अभ्यासासाठी व पूरक लिंक. व वेबसाइट पत्ता**

1) https://ict4d.org.uk/2018/02/06/cashless-india-a-new-digital-divide
2) http://ebalbharati.in/main/publicHome.aspx
3) https://ncert.nic.in/
4) http://www.maa.ac.in/index.php?tcf=library_sectionv
5) Www.swayam.gov.in
6) https://www.swayamprabha.gov.in/
7) https://diksha.gov.in.

**संदर्भ / References -**

1.Aser reports 2020

2.Article by Bharat Kharbanda, Chief Operating Officer at Global University Systems (GUS)

3.http://ohrh.law.ox.ac.uk

4.https://www.researchgate.net/publication/293123947_ICT_and_digital_divide_in_Indian_school_system
5.http://bweducation.businessworld.in/article/How-Online-Schooling-Has-Forced-India-To-Confront-The-Digital-Divide
6.https://www.orfonline.org/research/strengthening-the-online-education-ecosystem-in-india/
7 .समप्रीत  कौर / आयुषी जैन  | 19 जून 2020 रोजी अद्यतनित 19 जून 2020 रोजी प्रकाशित लेख.
8. नॅशनल स्टॅटिस्टिक्स ऑफिसचा भारतातील शिक्षणातील डिजिटल डिव्हाइड संबंधातील सर्व्हे रिपोर्ट - 2020.
9. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र ,संबंधातील वर्ष 2015-19 दरम्यानचे शिक्षणाचे डिजिटलीकरण व शासकीय परिपत्रके.
10. MSCERT पुणे व Unicef यांचे, Rapid survey of student access to the Home Learning Package in Maharashtra रिपोर्ट
11. "प्रग्याता,डिजिटल शिक्षणासाठी प्रचार मार्गदर्शक तत्त्वे, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद".
12 .RTE 2009 / NEP 2020
13. Himanshu Tripathi, लिखित RED` Shine Publication चे Educational Technology and ICT in education पुस्तक .

**मोड्यूल विकसक**
श्री ओमप्रकाश शेळके
विषय सहायक
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
बुलडाणा

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

**मार्गदर्शक**
डॉ.नेहा बेलसरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद